**महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिम**
**तंटे मिटविण्याबाबत मार्गदर्शक सूचना**

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

शासन निर्णय, क्रमांक तंमुगा- १००८/सीआर- २५ /पोल-१५,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक : १६ एप्रिल, २००८.

**वाचा :** (१) गृह विभाग, शासन निर्णय, क्रमांक १००७/सीआर २३८/पोल-८, दिनांक १९.७.२००७.

GMG1070701

**शासन निर्णय :**—राज्यामध्ये " महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिम " गृह विभाग शासन निर्णय दिनांक १९.७.२००७ अन्वये दि. १५ ऑगस्ट, २००७ पासून सुरू करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ७(२) व ७(३) अन्वये तंटे मिटविण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, गावातील तंटे मिटविताना तंटामुक्त गाव समितीस काही तंटे मिटविण्याबाबत येणाऱ्या अडचणी विचारात घेवून असे तंटे मिटविण्याबाबत शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहेत :—

(१) पती-पत्नीमधील विवादाची प्रकरणे, पोटगी, वाढीव पोटगीची प्रकरणे यासंदर्भातील तंटे मिटवित असताना प्रतिवादी ज्या गावच्या क्षेत्रातील रहिवाशी आहे त्या गावाच्या तंटामुक्त गाव समितीने असे तंटे मिटविण्यासाठी विचारात घ्यावेत. अशा तंटयातील वादी ज्या गावातील रहिवाशी आहे त्या गावाच्या तंटामुक्त गाव समितीने तंटा तडजोडीने मिटविण्यासाठी दुसऱ्या गावातील तंटामुक्त गाव समितीस संपूर्ण सहकार्य करावे.

(२) मालमत्तेसंदर्भातील वादाच्या प्रकरणांमध्ये पक्षकार एकापेक्षा अधिक गावातील रहिवाशी असल्यास वादातील मालमत्ता ज्या गावाच्या हद्दीमध्ये आहे, त्या गावाच्या तंटामुक्त गाव समितीने अशा मालमत्तेबाबतचा तंटा तडजोडीने मिटविण्याबाबत कार्यवाही करावी.

(३) शासनाने/ सार्वजनिक प्राधिकरणाने/ किंवा संस्थेने एखाद्या व्यक्तीच्या विरुध्द दावा दाखल केला असेल अथवा एखाद्या व्यक्तीने शासनाविरुध्द/सार्वजनिक प्राधिकरणाविरुध्द/संस्थेविरुध्द दावा दाखल केला असेल तर, असे दावे तडजोडीने मिटविण्यासाठी तंटामुक्त गाव समितीने विचारात घेऊ नयेत. अशा प्रकारचे दावे या मोहिमेतून वगळण्यात येत आहेत.

२. सदर शासन निर्णय राज्य शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २००८०४१७१५३११४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

मा.आ.गुट्टे
( मा. आ. गुट्टे )
अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्यातील सर्व मा. लोकसभा/राज्यसभा सदस्य,
सर्व मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य (पत्राद्वारे),
मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व पालक सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व विभागीय सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व पोलीस अधीक्षक,
सर्व उप विभागीय अधिकारी (जिल्हाधिकारी यांचेमार्फत),
(यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयाच्या छायांकित प्रती आपल्या नियंत्रणाखालील प्रत्येक मंडळ अधिकारी, तलाठी, पोलीस पाटील यांना पोहचविण्याची व्यवस्था करावी.)
सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी (पोलीस अधीक्षक यांचेमार्फत).
(यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयाच्या छायांकित प्रती आपल्या नियंत्रणाखालील प्रत्येक पोलीस ठाणे, प्रत्येक ग्रामपंचायत यांना पोहचविण्याची व्यवस्था करावी.)
सर्व गटविकास अधिकारी (मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांचेमार्फत).
सर्व तहसिलदार (जिल्हाधिकारी यांचेमार्फत).
निवड नस्ती (पोल-१५).